# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# विहिरी जवळ असलेली स्त्री


लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Lazarus
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen



60 गोष्टींतील 47 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

येशू आणि त्याचे शिष्य शोमरोन नावाच्या विभागातून प्रवास करित होते. ते सूखार नावाच्या शहराजवळ आले.



1

नेथे एक विहिर होती, सूखार येथील लोक पिण्याचे पाणी घेण्यासाठी येथे येत असत. फार वर्षांपूर्वी इस्त्राएलांचा पिता याकोब याने हि विहिर खोदली होती.



2


भर दुपारी कदाचित उन असल्यामुळे वातावरण फार गरम असेल. शिष्य सूखारमध्ये अन्न विकत घ्यायला गेले तोवर चालून चालून दमलेला येशू त्या विहिरी जवळ बसला.
3
येशू सोबत कोणीच नव्हते; पण जास्त वेळ पर्यंत तो एकटाच राहिला नाही. सूखार मध्ये राहणारी एक स्त्री पाणी भरण्यासाठी तेथे आली. येशू तिला म्हणाला,
"मला प्यावयाला पाणी दे."
4
त्या स्त्रीला नवल वाटले, तिने येशूला म्हटले, "आपण यहुदी असतां माझ्यासारख्या शोमरोनी स्त्रीजवळ प्यावयाला पाणी मागता हे कसे?"
5
त्या दिवसांत यहुदी लोक शोमरोनी लोकांबरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार करित नसत.
6
"मी कोण आहे हे जर तुला कळले असते, तर तूं माझ्याजवळ जिवंत पाणी मागितले असते." असे जेंव्हा येशूने तिला म्हटले तेंव्हा तर तीला जास्तच नवल वाटले.
7
आणि ती स्त्री येशूला म्हणाली, "महाराज पाणी काढावयास आपणांजवळ काहीच साधन नाही व विहीर तर खोल आहे, मग ते जिवंत पाणी आपणाजवळ कोठून? ... आमचा पूर्वज याकोब याच्यापेक्षा आपण मोठे आहांत काय?"
8

येशूने तिला उत्तर दिले, "जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल.



9

परंतू मी देईन ते पाणी जो कोणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही; जे पाणी मी त्याला देईन ते त्याच्यामध्ये सार्वकालिक जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा असे होईल." ती स्त्री येशूला म्हणाली, "... ते पाणी मला द्या."



10

येशूने तिला म्हटले, तूं जाऊन आपल्या नवऱ्याला बोलावून आण. त्यावर ती स्त्री म्हणाली, "मला नवरा नाही." मग येशूने तिला म्हटले, "तुला पाच नवरे होते, आणि आता जो तुझ्याबरोबर आहे तो तुझा नवरा नाही."



11

येशू संदेष्टा आहे हे त्या स्त्रीने ओळखले. तेंव्हा देवाची भक्ति कुठे करावी; यरुशलेमात किंवा शमरोनातील पवित्र डोंगरावर? याविषयी ती वाद करण्याचा प्रयत्न करु लागली. येशूने म्हटले, खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतात.



12

ती स्त्री येशूला म्हणाली, "मशीहा येणार आहे हे मला माहित आहे, तो आल्यावर आम्हांला सर्व गोष्टी सांगेल.



13

येशू तिला म्हणाला, "जो तुझ्याबरोबर बोलत आहे तो मी तोच आहे." इतक्यांत त्याचे शिष्य आले. त्या स्त्रीने तिची महागडी घागर तेथेच राहू  दिली आणि ती शहरात परतली.



14



ती सूखार शहरातील लोकांना म्हणाली, "चला, मी केलेले सर्व काही ज्याने मला सांगितले, तो मनुष्य पाहा; तोच ख्रिस्त असेल काय?" तेंव्हा ते लोक शहरातून निघून येशूला पाहण्यासाठी गेले.

15

दरम्यानच्या वेळेत, शिष्यांनी येशूला जेवण करण्यास विनंती केली. परंतू येशू त्यांना म्हणाला, "ज्याने मला पाठविले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे व त्याचे कार्य सिध्दीस न्यावे हेच माझे अन्न आहे." लोकांना देवाकडे आणणे हे त्याचे कार्य होते.



16

त्या स्त्रीच्या बोलण्यावरुन त्या शहारातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. त्यांनी येशूला त्यांच्याबरोबर राहण्याची विनंती केली; आणि दोन दिवस येशू त्यांच्याबरोबर तेथे राहिला.



17

येशूने सांगितलेल्या वचनावरुन आणखी कितीतरी लोकांनी विश्वास धरला. ते म्हणाले, "... आम्ही स्वतः ऐकले आहे व हा खरोखर ख्रिस्त, जगाचा तारणारा आहे हे आम्हांला कळले आहे."



18

विहिरी जवळ असलेली स्त्री

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान ४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!